# 'द न्यूज बिज टाईम्स'

दि. ९/९/२०२५ पिंपरी, महाराष्ट्र. thenewzbiz@gmail.com वर्ष - दुसरे डिजीटल आवृत्ती


## डॉ. डी. वाय. पाटील एसीएस कॉलेज, पिंपरी आणि क्विक हील फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने

# सायबर जनजागृती उपक्रमाला प्रतिसाद

**थेरगाव, प्रतिनिधी :**

सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या प्रकल्पांतर्गत आणि माय डेटा, माय रिस्पॉन्सिबिलिटी या थीमवर डॉ. डी. वाय. पाटील एसीएस कॉलेज, पिंपरी येथील क्विक हील फाउंडेशन सायबर वॉरियर्स क्लबच्या प्रणाली माने आणि नेहा माडिवाळकर यांनी थेरगाव येथील महिला बचत गटासाठी सायबर जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

महिलांच्या मंगळागौर कार्यक्रमाला लोकप्रतिनिधी माया बारणे उपस्थित होत्या. या सत्रामध्ये महिलांना ओटीपी घोटाळे, ऑनलाइन खरेदीतील फसवणूक, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि डिजिटल अरेस्ट घोटाळे याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. ऑनलाइन फसवणुकीपासून स्वतः चे व कुटुंबाचे संरक्षण कसे करावे, संशयास्पद लिंक व कॉलपासून सावध कसे राहावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच सायबर फसवणूक झाल्यास त्वरित सायबर हेल्पलाइन क्रमांक १९३० वर संपर्क साधावा आणि www.cybercrime.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले. या उपक्रमासाठी डॉ. डी. वाय. पाटील एसीएस कॉलेज, पिंपरीचे प्राचार्य डॉ. रणजित पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच शिक्षक समन्वयक सत्यवान कुंजिर यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन केले.

हा उपक्रम क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला. महिलांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करून माय डेटा, माय रिस्पॉन्सिबिलिटी हा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

